## प्रेस नोट ता. १०/०३/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड

# गुजरात मधील १६ गुन्हयात फरार असणारे घरफोडीचे दोन सराईत गुन्हेगारांना अटक
# ६० तोळे वजनाचे सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम,मोटार सायकली मिळुन
# एकुण किं.रु. २४,६८,४००/- रुपयांचा मुददेमाल हस्तगत
# पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील एकुण १६ घरफोडीचे गुन्हे उघडकिस
## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

दि. १७/०२/२०२३ रोजी वाकड पोलीस ठाण्यात गु.र.नं. १५२/२०२३ भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल असुन, त्यात **फ्लॅट नं ८, बिल्डींग नं २०, कावेरीनगर पोलीस वसाहत वाकड पुणे** येथील शासकिय निवासस्थान मध्ये कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे दरवाजाचा कोयंडा कशाचे तरी सहाय्याने तोडुन घराचे बेडरुममधील लोखंडी कपाटाचे लॉकरमधुन घरफोडी चोरी करून एकुण ६,२८,५००/- रु. किं.चे सोन्याचे, चांदीचे दागीने व रोख रक्कम चोरी केलेबाबत गुन्हा दाखल आहे.

**मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड यांनी आरोपी अटक करून गुन्हा उघड करणेबाबत आदेशित केले.** त्या अनुषंगाने मा.श्री.सत्यवान माने,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करून आरोपीना अटक करून गुन्हा उघड करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी घरफोडी चोराबाबत माहिती प्राप्त करण्यासाठी तांत्रिक तपास व पांरपारिक गोपनिय बातमीद्वारे माहिती प्राप्त करून तपास सुरू केला. त्याकरिता अनेक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली तसेच रात्रीचे सापळे रचण्यात आले. तपासादरम्यान **पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोहवा.प्रमोद कदम** यांना विश्वासु बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, सदर घरफोडी चोरी करणारे दोन चोरटे रावेत परिसरात येणार आहेत. तात्काळ सपोनि. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण स्टाफसह प्राप्त माहिती अनुषंगाने रावेत मधील शिंदेवस्ती मधील गणपती मंदिराजवळ रवाना झाले. काही वेळात सदर ठिकाणी प्राप्त माहितीचे वर्णनाचे दोन इसम एका यामाहा एफ झेड मोटार सायकल क्र. एमएच ०४ एफवाय ६७७२ वरून सदर ठिकाणी आले. पोलीसांची चाहुल लागताच आरोपीं सदर ठिकाणांवरुन पळुन जाण्याचा प्रयत्न करित असतांना श्री. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण यांनी सोबतच्या स्टाफसह शिताफिने त्यांना ताब्यात घेतले. सदर दोघांचे नाव पत्ते विचारले असता त्यांनी त्यांची नावे **१) लखनसिंग क्रिपालसिंग सरदार, वय २८ वर्षे, २) सतपालसिंग क्रिपालसिंग सरदार, वय २६ वर्षे, दोघेही रा. घासकौर दरवाजा, वासूदेव लाठीच्या समोर, वडनगर, जि. म्हैसाना, राज्य गुजरात** असे सांगितले. त्यातील सतपालसिंग याचे खांद्यावर अडकविलेल्या सॅगमध्ये एक लोखंडी कटावणी, स्क्रू ड्रायव्हर, पोपट पान्हा असे साहित्य मिळून आले. त्यामुळे सदरचे दोन्ही इसम घरफोडी करणारे आरोपीच असल्याचे खात्री झाली. सदर आरोपींना गुन्हयात अटक करण्यात आले असुन दि.१३/०३/२०२३ पर्यंत पोलीस कोठडी प्राप्त झाली आहे.

आरोंपीकडे झाले तपासात सदरचे दोन्ही आरोपीं हे सख्खे भाउ असुन आरोपी यांनी **गुजरात राज्यात घरफोडी चोरीचे एकुण १६ गुन्हे केले असुन सदर गुन्हयात ते फरार अ**सल्याचे निष्पन्न झाले आहे. गुजरात पोलीस विशेष करून म्हैसाना व पाटण एल.सी.बी. त्यांचा शोघ घेत आहे.

आरोंपीकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता त्यांनी पिंपरी चिंचवड परीसरातील घरफोडी चोरीचे एकुण १५ व वाहन चोरीचा ०१ गुन्हा असे एकुण १६ गुन्हयांची कबुली दिली आहे. दोन्ही आरोपींकडुन एकुण २४,६८,४००/- रुपये किंमतीचे सोन्याचे, चांदीचे दागिणे व रोख रक्कम तसेच गुन्हा करतांना वापरण्यासाठी चोरी केलेली मोटार सायकल असा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**आरोपींकडुन खालील गुन्हे उघड करणेत आले आहेत.**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ९०/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| २ | वाकड | १२६/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ३ | वाकड | १५२/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ४ | वाकड | १५६/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ५ | देहुरोड | ६६/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ६ | देहुरोड | ८८/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ७ | देहुरोड | ८९/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ८ | देहुरोड | ११६/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ९ | पिंपरी | १८६/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १० | पिंपरी | १९२/२०२३ | भा.द.वि.कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे |
| ११ | पिंपरी | २६१/२०२३ | भा.द.वि.कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे |
| १२ | चिंचवड | ४९/२०२३ | भा.द.वि.कलम ३८०,४५४,४५७ प्रमाणे |
| १३ | चिंचवड | ५२/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १४ | चिंचवड | ७९/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १५ | रावेत | ७३/२०२३ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १६ | निगडी | ९३/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.मनोज लोहीया सह पोलीस आयुक्त, मा. डॉ.संजय शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री. संतोष पाटील पोलीस निरीक्षक गुन्हे-१, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, सपोफौ.राजेंद्र मारणे, पोहवा.वंदु गिरे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोहवा संतोष बर्गे, पोहवा.दिपक भोसले, पोना.प्रशांत गिलबीले, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, पोशि.सागर पंडीत (परि-०२ कार्यालय) यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड

**१. लखनसिंग क्रिपालसिंग सरदार २. सतपालसिंग क्रिपालसिंग सरदार** यांचेवर गुजरातमध्ये फरार असणारे गुन्हे खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १. | लक्ष्मीपुरा पोलीस ठाणे, वडोदरा गुजरात | ३३२/२०२१ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| २. | गोरवा पोलीस ठाणे, वडोदरा गुजरात | २६५/२०२१ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ३. | गांधीधाम पोलीस ठाणे, गुजरात | ७१४/२०२२ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ४. | हिम्मतनगर बी डिव्हीजन पोलीस ठाणे (गांधीधाम) | ०७/२०१९ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ५. | पालमपूर पोलीस ठाणे , गुजरात | ९२१/२०२१ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ६. | पालमपूर पोलीस ठाणे , गुजरात | ४९७/२०२२ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ७. | पालमपूर पोलीस ठाणे , गुजरात | ६१२/२०२२ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ८. | पालमपूर पोलीस ठाणे , गुजरात | ६८१/२०२२ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| ९. | वागदोड पोलीस ठाणे, पाटण, गुजरात | ३११/२०२२ | भा.द.वि.कलम ३८०,४५४,४५७,४१३,३४ प्रमाणे |
| १०. | वागदोड पोलीस ठाणे, पाटण, गुजरात | ३२१/२०२२ | भा.द.वि.कलम ३८०,४५४,४५७,४१३,३४ प्रमाणे |
| ११. | सेक्टर ०७ पोलीस ठाणे गांधीनगर गुजरात | ७५/२०१९ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १२. | सेक्टर ०७ पोलीस ठाणे गांधीनगर गुजरात | ९७/२०१९ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १३. | सेक्टर ०७ पोलीस ठाणे गांधीनगर गुजरात | ११५/२०१९ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १४. | सेक्टर ०७ पोलीस ठाणे गांधीनगर गुजरात | १६३/२०१९ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १५. | सेक्टर ०७ पोलीस ठाणे गांधीनगर गुजरात | १८५/२०१९ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| १६. | डबोडा पोलीस ठाणे, गांधीनगर गुजरात | १८५/२०१९ | भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे |

# प्रेस नोट ता. १०/०३/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड

## कर्नाटक राज्यातुन पुण्यात गांजा विक्री करण्यासाठी आलेले ०२ आरोपींना अटक
## ०९ किलो ३०० ग्रॅम वजनाचे गांजासह एकुण किं.रु.७,५२,२४०/- चा मुददेमाल जप्त
## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

**मा. श्री. विनयकुमार चौबे साो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड शहरातील अंमली पदार्थ विक्री व वाहतुक करणारे धंदयांवर कारवाई करणेबाबत आदेश दिले आहेत.** त्या अनुषंगाने मा.श्री.सत्यवान माने,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार यांना अंमली पदार्थाबाबत कारवाई करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे सपोनि.संतोष पाटील व पोउपनि.सचिन चव्हाण यांची गुन्हे प्रकटीकरण पथकाची वेगवेगळी पथके तयार केली. सपोनि.संतोष पाटील हे त्यांचे पथकासोबत पेट्रोलींग करीत असताना त्यांचे पथकातील **पोलीस हवालदार, ब.नं. ६८० संदिप सोमनाथ गवारी** यांना विश्वासु बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, कर्नाटक राज्यातुन गांजाची विक्री करण्यासाठी पुण्यात आलेली कार बिर्ला हॉस्पीटल थेरगाव पुणे येथे येणार आहे. सपोनि.संतोष पाटील व स्टाफ यांनी मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी सापळा रचला. मिळाले बातमी प्रमाणे एक टाटा इंडीका विस्टा कार नं. KA 56 M 0179 सदर ठिकाणी आली. त्यातील दोन इसम संशयीतरित्या हालचाल करीत असल्याने प्राप्त बातमीची खात्री झालेने सदरचे कारला शिताफीने घेराव घालुन कार व त्यातील दोन इसमांना ताब्यात घेण्यात आले. सदर कारमधील दोन इसमांना नाव पत्ता विचारला असता त्यांनी आपली नावे **१) राहुल विठ्ठल जाधव, वय २२ वर्षे, रा. व्हि. के. सलगर तांडा, ता. कमलापूर, जि. गुलबर्गा, राज्य कर्नाटक २) शालीवान आप्पाराव वाडी, वय ३२ वर्षे, रा. संगमेश्वर मंदिराजवळ,मुद्दडगा, ता. कमलापूर, जि. गुलबर्गा, राज्य कर्नाटक** अशी सांगीतली. त्यांचे कारची रितसर झडती घेतली असता त्यामध्ये **एकुण ०९ किलो ३०० ग्रॅम** वजनाचा गांजा मिळुन आलेने **वाकड पोलीस ठाणे गु.र.नं. २३६/२०२३ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(ii)(ब)** प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असुन एकुण **किं.रु.७,५२,२४०/- चा मुददेमाल** जप्त करण्यात आलंला आहे. दोन्ही आरोपींची दि.१०/०३/२०२३ रोजीपर्यंत पोलीस कोठडी रिमांड प्राप्त असुन चौकशी चालु आहे.

सदर आरोपी हे जप्त करण्यात आलेला गांजा कर्नाटक राज्यातुन पुण्यात विक्री करता घेवुन आल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन सदर आरोपींचे संपर्कात पुणे व पिंपरी चिंचवड मधील कोण आरोपी आहेत याबाबत तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे साो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.मनोज लोहीया सह पोलीस आयुक्त, मा. डॉ.संजय शिंदे साो, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे साो, पोलीस उप आयुक्त,परि २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त साो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री. संतोष पाटील पोलीस निरीक्षक गुन्हे-१, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, सपोफौ.मारणे, पोहवा.वंदु गिरे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोना.प्रशांत गिलबीले, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि.सागर पंडीत (परि-०२ कार्यालय) यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड

# प्रेस नोट ता. १०/०३/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड

## सराईत गुन्हेगारास बेकायदा पिस्तुल बाळगले प्रकरणी अटक
## ०२ देशी बनावटीचे पिस्तुल व ०३ जिवंत काडतुस जप्त
### वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

**मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड शहरात बेकायदा शस्त्र बाळगुन त्याद्वारे दहशत माजविणा-या गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत आदेश दिले होते.** त्या अनुषंगाने मा.श्री.सत्यवान माने,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि श्री. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार यांना बेकायदा शस्त्र बाळगणारे गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे सपोनि. संतोष पाटील व पोउपनि.सचिन चव्हाण यांची वेगवेगळी पथके तयार केली. सपोनि.संतोष पाटील हे त्यांचे पथकासोबत पेट्रोलींग करीत असताना त्यांना विश्वासु बातमीदारामार्फत माहीती मिळाली आहे की, रेकॉर्ड वरील गुन्हेगार नामे करण गजानन चोपवाड रा. शिवराजनगर रहाटणी पुणे हा सावित्रीबाई फुले गार्डन, मॅजेस्टीक हॉटेल जवळ जगताप डेअरी पुणे येथे स्वतःकडे पिस्तुल बाळगुन उभा आहे.अशी बातमी मिळालेने **सपोनि.संतोष पाटील, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, पोहवा.प्रमोद कदम, पोना.राम तळपे, पोना.अतिक शेख, पोशि.तात्या शिंदे** यांनी मिळाले बातमीचे ठिकाणी जावुन खात्री केली असता करण चोपवाड आपले खांदयावर काळया रंगाची सॅक घेवुन संशयीतरित्या उभा असलेला दिसल्याने त्यास लागलीच शिताफीने ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे खांदयावरील सॅक मध्ये ०२ देशी बनावटीचे पिस्तुल व ०३ जिवंत काडतुस मिळुन आलेने **वाकड पोलीस ठाणे गु.र.नं. २२१/२०२३** भारताचा शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)(३) सह १३५ गुन्हा दाखल असुन तपास चालु आहे.

सदर सराईत आरोपी करण चोपवाड हा शरीराविरुध्द् गुन्हे करणारा असुन त्याचेवर यापुर्वी खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गु.रजि.नं. कलम |
|---|---|---|
| १ | वाकड | ८३९/२०२२ भादविक ३२६,३२३,५०४,५०६ आर्म ॲक्ट ४,२५ |
| २ | वाकड | ९७७/२०२१ भादविक ३०८,३८७,१४३,१४८,१४९,३५२,५०६ क्रिमीनल अमेंडमेट ॲक्ट कलम ३,७ आर्म ॲक्ट ४,२५ मपोआ.३७(१),१३५ |
| ३ | वाकड | ०५/२०२१ आर्म ॲक्ट ४,२५ मपोआक ३७(१),१३५ |

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.मनोज लोहीया सह पोलीस आयुक्त, मा. डॉ.संजय शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री. संतोष पाटील पोलीस निरीक्षक गुन्हे-१, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि. संतोष पाटील, सपोनि.संभाजी जाधव, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.२९२४ वंदु गिरे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.९४० दिपक साबळे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.१०८३ अतिश जाधव, पोहवा.१११८ प्रमोद कदम, पोना.१६६२ प्रशांत गिलबीले, पोना.अतिक शेख,पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.२४२३ कौतेंय खराडे, पोशि.२५०२ भास्कर भारती, पोशि.२१०६ स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड